I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 231-236 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# ग्रामीण विकासात ग्रामीण साहित्याची भूमिका

प्रा. पराग एम. सपाटे

सहाय्यक प्राध्यापक

स्व. संजय चहांदे कला व प्रमोद चहांदे वाणिज्य महाविद्यालय, कन्हान, ता. पारशिवनी, जि. नागपूर, महाराष्ट्र

Corresponding Author : paragsapate @gmail.com

Communicated : 06.04.2022 | Revision : 08.04.2022 Accepted : 15.04.2022 | Published : 02.05.2022

**प्रस्तावना :**

भारताचा इतिहास म्हणजे पर्यायाने ग्रामीण जनतेच्या उत्क्रांतीचा इतिहास होय. 'खंडणे' म्हणजे जमीन कसणे व 'खेडूत' म्हणजे जमीन कसणारा, तेव्हा 'खेडुतांची वस्ती' ते 'खेडे' अशी खेडयाची व्याख्या केली जाते. वैदीक वाङ्मयात खेडयाचा उल्लेख 'ग्राम' म्हणून येतो. 'ग्राम' याचा मूळ अर्थ घरांचा समुह असा आहे.

एकूणच ग्रामीण समाज म्हणजे खेडयात राहणारा व प्रामुख्याने शेती व्यवसायशी संबंधित असलेला समाज होय. शेती व्यवसायाचे प्राधान्य मानवनिर्मित वातावरणाऐवजी निसर्गाचे सान्निध्य, समाजाचा आटोपशीर आकार, तुरळक लोकवस्ती, भौगोलिक मर्यादीत भाग व एकजिनसीपणा इ. वैशिष्ट्यामुळे ग्रामीण समाज हा शहरी समाजापासून वेगळा समजला जातो. ग्रामीण भागातील व्यक्तिचे सामाजिक संबंध व्यक्तिगत स्वरूपाचे व दीर्घकाळ टिकणारे असतात. ते अशा समाज व्यवस्थेत राहतात की, ज्यामध्ये आर्थिक श्रमविभागणीमुळे आवश्यक असणाऱ्या सहकार्यात्मक संबंधापेक्षा हे संबंध अधिक भावनिक स्वरूपाचे असतात. संपुर्ण जीवनव्यवहारात अतिशय महत्त्वपुर्ण कामगिरी बजावित असूनही महाराष्ट्रात किंवा साऱ्या हिंदूस्थानात दुर्लक्षित राहिलेली जमात म्हणजे शेतकऱ्यांचा वर्ग होय. बळीराजा किंवा 'शेतकरी सुखी तर जग सुखी' असे सतत म्हटल्या जाणाऱ्या आणि कृषी संस्कृतीचा वारसा सांगणाऱ्या आपल्या देशात किंवा महाराष्ट्रात आजही वर्तमानकाळात शेती व शेतकरी यांची दयनीय अवस्था आहे, ही वस्तुस्थिती आहे आणि हीच दयनिय अवस्था बदलावी, शेतकरी सुखी व्हावा, शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती व्हावी या करीता महात्मा ज्योतिबा फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' हा ग्रंथ सर्वप्रथम लिहला. या ग्रंथाच्या केंद्रस्थानी सामान्य शुद्र शेतकरी आहे. शेतकरी अन्याय लुबाडणूकीपासून मुक्त कसा होईल त्याचे जीवन सुखी समाधानी कसे होईल याची चिंता फुल्यांना होती. याचे वर्णन त्यांनी या ग्रंथातून केले आहे. भारतीय शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे प्रथम वेशीवर टांगणाऱ्या महात्मा फूले यांना 'कृषिक्रांतीचा अग्रदूत' ही बिरूदावली डॉ. स. गं. मालशे यांनी बहाल केली आहे. म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्युथर' असे म्हणतात. 'शेतकऱ्यांचा असुड' हे महात्मा फुल्यांचे पुस्तक ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन उघड्या नागड्या डोळ्यांनी मांडलेले आहे. म्हणून ग्रामीण साहित्याचा आद्य प्रणेता महात्मा फुले यांना संबोधले जाते. शेतकऱ्यांच्या अवस्थेविषयी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज 'अर्पण' पत्रिकेत लिहितात,

"सर्व ग्रामासि सुखी करावे । अन्न–वस्त्र–पात्रदि द्यावे ।
परि स्वतः दुःखचि भोगावे । भूषण तुझे ग्रामनाथा ।।
कष्ट करोनि महाल बांधसी । परि झोपडीही नाही नेटकीशी ।
स्वातंत्र्याकरिता उडी घेशी । मजा भोगती इतरचि ।।
ऐशा भोळ्या शंकरासि । सौख्य लाभावे सर्व देशी ।
मानवाची पूर्णता तुजसी । प्राप्त व्हावी मना वाटे ।।"[1]

अश्याप्रकारे सर्वांना अन्न, वस्त्र प्रदान करणारा शेतकरी, जगाचा पोशींदा हा मात्र दुःख भोगीतच आपले जीवन व्यतीत करीत असतो. शेतकऱ्यांची ही दयनीय अवस्था आपल्या ग्रमगीतेतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मांडली आहे. सोबतच

ग्रामाचे, गावाच्या विकासाच्या योजनाही त्यांनी या ग्रंथातून सर्वप्रथम मांडली आहे आणि हीच ग्रामीण साहित्याची नांदी ठरली.

''आपल्या देशातील झोपी गेलेली खेडी जागी व्हावीत, अज्ञान लोकभ्रम आणि सामाजिक जडत्व यामुळे खेड्यातल्या जीवनाला जी अवकळा आली आहे ती नाहीशी व्हावी, तिथल्या माणसांच्या मनाचे आरसे स्वच्छ पुसले जावेत; त्यांत विविध सुधारणांची आणि नव्या सुखी जीवनाच्या स्वप्नांची प्रतिबिंबे पडावीत; त्यांच्या मरगळलेल्या जीवनात चैतन्य निर्माण व्हावे; त्यांच्या अंतःकरणावर दाटलेले शेवाळे दूर होऊन आतले नितळ पाणी दिसावे व ते प्रत्येकाच्या उपयोगी पडावे; सांस्कृतिक वारशाच्या दुष्टीने भाग्यशाली असलेला हा देश शिक्षण, आरोग्य, धनधान्य इत्यादी बाबतीत तितकाच वैभवशाली व्हावा; म्हणून संत तुकडोजी महाराजांचे मन सदैव तळमळत आले आहे.''[2]

राष्ट्रसंतासारखी गावाच्या विकासाची, बदलाची हीच तळमळ अनेक ग्रामीण साहित्यकारांच्या मनात होती. शेतकऱ्यांचे जीवन, त्यांची दयनिय अवस्था मुळापासूनच बदलली पाहिजे. पर्यायाने गावाचा, खेड्याचा विकास झाला पाहिजे या तळमळीने लेखन करायला सुरूवात केली. गावाच्या समस्या, प्रथा, परंपरा, संस्कृती, शैक्षणिक अडचणी वैद्यकीय अडचणी, वाहतुकीच्या समस्या, अंधश्रद्धा याविषयी आपल्या साहित्यातून लेखन सुरू केले. ते करीत असताना प्रत्येकांनी आपला विषय कोणत्या साहित्य प्रकारातून प्रकर्षाने व प्रभावीपणे मांडता येईल या अनुषंगाने साहित्य प्रकार निवडून लेखन करायला सुरूवात केली व त्यातूनच ग्रामीण कथा, ग्रामीण कादंबरी, ग्रामीण नाटके, ग्रामीण कविता, प्रकर्षाने पुढे येऊ लागल्या. ग्रामीण किंवा प्रादेशीक ही एक वाड्मयीन प्रवृत्ती असून त्यासाठी लेखन करणाऱ्या लेखकाच्या ठिकाणी ग्रामीण संवेदनशीलता असावी लागते. ग्रामीण वास्तवाचा लेखकाच्या मनावर जो उत्कृष्ट परिणाम होतो व त्यातून निर्मितीचा जो घाट साधला जातो अशा साहित्याला 'ग्रामीण' संबोधता येते.

ग्रामीण साहित्य हे खऱ्या अर्थाने माणसाचे साहित्य आहे. माणूस स्वतःला बदलू शकतो त्याचप्रमाणे तो आपल्या भोवतीचे वास्तव विचाराने बदलू शकतो. बदल हा मानवी जीवनाचा धर्म आहे. फुले, आंबेडकर गांधीजींनी शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे हे सांगितले. शेतकऱ्याच्या अगतिकतेचे मूळ त्यांच्या अज्ञानात व अशिक्षितपणात आहे, हे फूले यांनी नेमकेपणाने मांडले.

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली,
नीतिविना गति गेली, गती विना वित्त गेले,
वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने
केले.

महात्मा फुलेंनी विद्येचे महत्त्व आपल्या अखंडातून सांगितले आणि वरच्या थराला ज्ञान दिले म्हणजे ते झिरपत तळापर्यंत येते, या ब्रिटिश नीतीचा त्यांनी विरोध केला. परिवर्तनाची प्रक्रिया गतिमान होण्यासाठी साहित्याने समाजमनात परिवर्तनाचा विचार रूजविला पाहिजे. परिवर्तनवादी ग्रामीण साहित्याला केवळ ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवून चालणार नाही, तर ग्रामीण जीवनाचे अर्थपुर्ण विश्लेषण करणे गरजेचे आहे. शेतकऱ्याच्या असुड च्या केंद्रस्थानी सामान्य शुद्र शेतकरी आहे. तो अन्याय लुबाडणूकीपासून मुक्त कसा होईल, त्याचे जीवन सुखी–समाधानी कसे होईल यांची चिंता फुले यांना आहे. एकूणच शेती विषयीची फूले यांची उपजत पारंपारिक जाण अधिक सूक्ष्म व सरस आहे. अतिशुद्र व स्त्रिया यांची स्थिती, सामान्य शुद्र शेतकऱ्यांची स्थिती, सामान्य कामगारांची स्थिती ही ज्योतीबांच्या समाजाच्या निकोपपणाची, चांगुलपणाची कसोटी होती, ही गोष्ट महत्त्वाची आहे. शेतकऱ्याचा असुड चा जर काही संदेश असेल तर तो हाच आहे की, 'कष्टकऱ्यांच्या घरात लक्ष्मी नांदावी' हेच अंतिम सुत्र आहे.

ग्रामीण साहित्याची मुहूर्तमेढ रोवण्याचे महनीय कार्य महात्मा ज्योतीराव फुले यांनी केले, देशातील शुद्रातिशुद्र समाजाच्या उद्धारासाठी महात्मा फुले यांनी जी विचारसरणी मांडली तीच ग्रामीण साहित्याची वैचारिक व तात्त्विक भूमिका आहे. पुढे शोषक आणि शोषित अशा द्वैती संघर्षावर ग्रामीण साहित्याची मांडणी सुरू झाली.

साहित्य आणि समाज यांचा अनोन्य संबंध आहे. कुठलाही लेखक हा समाजाचाच एक घटक असतो; आणि सामाजिक घडामोडीतून लेखकाचे विचार साहित्याच्या रूपाने उत्क्रांत होत असतात. भारत देश हा कृषिप्रधान देश असल्यामुळे येथील जनतेची पाळेमुळे प्रामुख्याने कृषीक्षेत्राशी व

पर्यायाने खेड्याशी जुळलेली आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्याचा केंद्र देखील कृषी व त्यावर आधारित जनसमुदाय हाच आहे. ग्रामीण संस्कृती ही जशी कृषिकेंद्रीत आहे त्याचप्रमाणे एकत्रित कुटुंब पद्धती हे देखील ग्रामीण संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. ग्रामीण परिसरातील एकत्रित कुटुंब पद्धतीमुळे तेथे मनुष्य बळही सक्षम आणि मोठे असल्याचे दिसून येते. शिवाय परस्पराविषयीचा स्नेहभाव आणि प्रेमाचा ओलावा तेथे अनुभूतीस येतो. तेथील माणसे ज्याप्रमाणे सामुहिकरित्या शेतातील काबाडकष्ट करतात त्याचप्रमाणे एकमेकांच्या सुख—दुःखात समरस देखील होतात. एकुणच मदतनीस वृत्ती हे या संस्कृतीचे प्रधान वैशिष्ट्य दिसून येते. या लोकसमुदायातून त्यांच्या जीवन जाणिवातून जे साहित्य आकाराला येते. त्याला प्रामुख्याने ग्रामीण साहित्य असे संबोधल्या जाते. यावरून ग्रामीण साहित्य म्हणजे खेड्यातून जन्माला येणारे, खेड्यातील भाव भावना, संवेदना, आशय आणि विषय जोपासणारे साहित्य असे म्हणता येईल.

महात्मा फुल्यानी या देशातील शुद्रातिशुद्र समाजाच्या उन्नयणासाठी जी विचारसरणी मांडली तीच ग्रामीण साहित्याची वैचारिक आणि तात्त्विक भूमिका ठरते. ग्रामीण साहित्य हा शब्द केवळ 'वर्णनात्मक' नाही तर तो वैशिष्ट्यदर्शन आहे. येथील बहुसंख्या जनता खेड्यात वास्तव्य करणारी व कृषी संस्कृतीशी निगडीत आहे. त्यामुळे ग्रामीण परिसरात वास्तव्य करणाऱ्या मनुष्याला परिवर्तनाची ओढ आहे. या संदर्भात महत्मा गांधीनी 'ग्रामराज्य—रामराज्यांची' अपेक्षा बोलून दाखविली होती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी 'ग्रामगीता' तून ग्रामव्यवस्था बळकट करण्यावर विशेष जोर दिला. 'ग्रामगीता' तील तेराव्या अध्यायात 'ग्रामनिर्माण कला' यातून आपली भूमिका स्पष्ट करताना लिहतात,

''हात फिरे तेथे लक्ष्मी शिरे । हे सूत्र ध्यानी ठेवोनि खरे ।
आपुले ग्रामचि करावे गोजिरे । शहराहूनि ।।1।।
हे गावीचे लोक विसरले । आळसाद्वारे दुर्दैव शिरले ।
दैन्य, दारिद्र्य सर्वत्र भरले । गावामाजी ।।2।।
शहरी यंत्रदिळे आली । गावची उद्योग कला मेली ।
कुशल माणसे शहरी गेली । उद्योगासाठी ।।3।।
कष्टाळू शक्ति, हस्तकला सिद्धी । तेही गेली ।।4।।
गावी उरली मुख्यतः शेती । तो कशीबशी चालविती ।
विशेष बुद्धी, शक्ति, संपत्ति । यांचा ओघ दुसरीकडे ।।5।।
उत्तम शिक्षित, सामर्थ्यवान । ते नाकरीसाठी फिरती वणवण ।
उद्योगधंदे वा शेती कोठून । होईल उन्नत गावची ? ।।6।।[3]

गावाची उन्नती झाली पाहिजे याकरीता तुकडोजी महाराज यांनी गावात आळसाद्वारे कसे दैन्य, दारिद्र्य शिरले, शहरात यंत्रयुग सुरू झाल्यामुळे गावातील उद्योग कला कशी मृतप्राय झाली, गावातील कुशल माणसे रोजगार निर्मिती करीता शहरात गेली, गावची बुद्धीवान माणसे शहरात गेली. असे विचारही त्यांनी आपल्या 'ग्रामनिर्माणकला' या अध्यायात मांडले. शहरातील सर्व उद्योगकला खेड्यात याव्यात त्यातून खेडी समृद्ध व्हावी अशी आशा राष्ट्रसंतांना होती. याचा अर्थच असा आहे की, ग्रामीण भारत स्वतःबद्दल अभिमान बाळगीत असला तरी मानवी मूल्यांचा स्वीकार करायला तो तयार आहे. ग्रामीण साहित्या संदर्भात गो. म. कुलकर्णी लिहतात, ''आधुनिक काळाने ग्राम संस्कृतीत जनतेला परंतु नव—शिक्षणामुळे या संस्कृतीपासून कलांतराने अलग झालेल्या नव—विचारवंताचा, नवलेखकांचा जो वर्ग निर्माण झाला, त्याला स्वतःचे वा इतरांचे आजच्या पर्यावरणातील जे ग्रामीण जीवन जाणवते त्याचे दर्शन आजचा ग्रामीण लेखक प्राधान्याने घडवित असतो. एकुणच आजचे व कालचे ग्रामजीवन, त्याचे मनोव्यापार, सांस्कृतिक संवेदना सखोलपणे आणि सर्वांगीण स्वरूपात ज्यात व्यक्त होते, असे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य, 'ग्रामीण' साहित्याच्या स्वरूपाविषयीची भुमिका मांडताना डॉ. नागनाथ कोतापल्ले लिहितात, 'ग्रामीण' संकल्पनेत 'ग्रामीण जगण्याच्या रीतीचा' अंतर्भाव होतो. नव्या ग्रामीणतेला एक मूल्यधिष्टित आणि समानतेच्या पायावर उभे असणारे जग अपेक्षित आहे. म्हणूनच 'ग्रामीणता' ही संकल्पना अधिक व्यापक होते. सर्व प्रकाराच्या शोषणाविरूद्ध

उभ्या राहणाऱ्या साहित्यप्रवाहांची ती सहकारी हाते'.

ग्रामीण मानसिकता, ग्रामीण जीवन पद्धती, ग्रामीण लोककला, ग्रामीण विधी, ग्रामीण सहजीवन, ग्रामीण संघर्ष, कृषीकेंद्रितता, निसर्गसन्मुखतता आदिमता, काळी आई, गावगाडा, ग्रामीण बोली, ग्रामीण संस्कृती, समाजाचा आटोपशीर आकार, तुरळक लोकवस्ती, भौगोलिक मर्यादीत भाग, बलुतेदारी, जातीव्यवस्था, ग्रामपंचायत, दु:ख, दारिद्र्य, दालित्य, अज्ञान, दुष्काळ, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, ग्रामीण शिक्षण, ग्रामीण राजकारण, ग्रामीण अर्थव्यवस्था, या घटकांशी ग्रामीण साहित्य संबंधीत असते. ज्यांचे वर्णन ग्रामीण साहित्यकार आपल्या साहित्यातून करीत असतो. त्याकरीता तो कथा, कादंबरी, नाटक, कविता या साहित्य प्रकाराचा आपल्या परीने वापर करीत असतो. ग्रामीण विकास हीच त्याची लेखनामागची भूमिका असते.

ग्रामीण साहित्य हे व्यक्तिकेंद्री नसून ते मानव केंद्री आहे. ज्या समाजव्यवस्थेने शेतकऱ्याला, कष्टकऱ्याला अगतिक केले आहे. त्यांच्या मनात संघर्षाची ठिणगी टाकण्याचे कार्य खरे ग्रामीण साहित्य करते. किंबहूना ग्रामीण साहित्यकार करीत आहेत. आपल्या साहित्यातून शेतकऱ्यांचे मुलभूत प्रश्नांना वाचा फोडत आहे. ग्रामीण विकासात महत्त्वाची भूमिका अनेक लेखक आपल्या लेखनातून निभवत आहेत. परीवर्तन हा ग्रामीण साहित्याचा कणा आहे; आणि ज्या साहित्यातून ग्रामजीवनातील हे परिवर्तन जाणवते तेच अस्सल ग्रामीण साहित्याच्या कसोटीला सिद्ध होते.

परीवर्तनवादी विचार स्वीकारून, शोषणाला विरोध करणे ही त्यांच्या लेखनामागची भुमिका होती, गरीब शेतकरी, शेतमजुर यांचे होणारे हाल, अतिवृष्टी, दुष्काळ यांच्यामुळे शेतकऱ्यांचे सतत होणारे नुकसान त्यात समाजव्यवस्थेमुळे पिचला गेलेला शेतकरी, सतत होणारे त्याचे शोषण या शोषणाला ग्रामीण लेखक आपल्या साहित्यातून मांडू लागला.

स्वातंत्र्यपूर्वी जमीनदार, वतनदार यांच्या माध्यमातून ब्राम्हण जातीचे वर्चस्व आणि नेतृत्त्व गावगाड्यात होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मराठा अगर कुणबी (पाटील) यांच्याकडे गावगाड्याचे नेतृत्व गेले. म्हणजेच शोषणाची परंपरा एका जातीकडून दुसऱ्या जातीकडे सुपूर्द होतच राहीलेली दिसते. एकुणच खोत, मालगुजार, इत्यादी मध्यस्थामुळे शेतकऱ्यांचे शोषण साततत्याने सुरू होते. पुढे सरकारी अधिकारी, तलाठी, पुढारी इत्यादी नवे शोषक शेतकऱ्यांना लुबाडण्यासाठी नव्याने तयार झालेले होते. शिवाय सावकार आणि व्यापारी वर्ग, दलाल हे शोषक होतेच. स्वातंत्र्योत्तर काळात खेडे वरवर बदलले दिसले तरी जुन्या प्रश्नांना शोषण, विषमता इत्यादी प्रश्न सातत्याने वाढतच होते. मध्यम शेतकरी, अल्पभुधारक, शेतमजूर, छोटे–मोठे कारागीर, यांची संख्या खेड्यात विपुल होती. गावगाडा बदलला तरी तो शोषण आणि विषमतेच्या जोखडात अधिकच गुरफटत चालला होता. एकीकडे हरितक्रांतीचा गवगवा सुरू असला तरी सामान्य माणूस दु:ख आणि दारिद्र्याच्या गर्तेत खितपड पडला होता. या विदारक अश्या वास्तवादी ग्रामजीवनाचे चित्रण करण्याकरीता ग्रामीण लेखक पुढे आले. विशेषत: 1960 नंतर ग्रामीण लेखकला सामाजिक जाणिवेने लिहावे असे वाटू लागले व त्यांनी कथा, कादंबरी, नाटक, कविता इ. वाड्मय प्रकारातून बदलत्या जाणिवेचे स्वरुप मांडण्याचा प्रयत्न सुरू केला.

1920 नंतर मराठीमध्ये वेगवेगळ्या साहित्यप्रकारात ग्रामीण जीवन प्रकट होऊ लागले. ग. ल. ठोकळ, र. वा. दिघे, वि. वि. हडप, सोपानदेव चौधरी, यशवंत, गिरीश अशी काही कवी लेखकांची नावे प्रारंभाचे लेखक म्हणून सांगता येतील. पुढे 1960 नंतर अनेक लेखकांनी प्रकर्षाने लेखन करायला सुरूवात केली. ग्रामीण साहित्याची चळवळ उभी करण्यात रा. र. बोराडे व आनंद यादव यांचा मोलाचा वाटा आहे. पुढे या चळवळीत आनंद यादव यांचा मोलाचा वाटा आहे. पुढे या चळवळीत अनेक लेखकांनी लेखन करण्यास सुरवात केली. ज्यात ग. ल. ठोकळ, र. वा. दिघे, वि. वा. हडप., श्री. म. माटे, व्यंकटेश माडगूडकर, शंकर पाटील, उद्धव शेळके, मनोहर तल्हार, विश्वास पाटील, भस्कर चंदनशिव, ना. धो. महानोट, इंद्रजित भालेराव, वासुदेव मुलाटे, श्रीराम गुंदेकर, सदानंद देशमुख, विठ्ठल वाघ, बाबाराव मुसळे, प्रतिमा इंगोले, रवींद्र शोभणे यांनी ग्रामीण जीवनाचे बहुविध चित्रण आपल्या लेखनातून मांडले. ग्रामीणाच्या वाट्याला येणारे दु:ख, वेदना,

अगतिकता, वैफल्य, न्युनगंड, दारिद्रय, लाचारी यांच्याच नशिबी का येते ? त्यांचे सदैव बळी 'बळीराजा' चा का पडतो ? ज्याला जगाचा पोशींदा म्हणतात पण त्याच्याच वाट्याला संकटाचा डोंगर का उभा राहतो ? असे भेदक प्रश्न सदैव आपल्या लेखनातून ते मांडताना दिसतात. त्यातूनच काही प्रमाणात का होईना पण शेतकऱ्याच्या ग्रामीण जीवनाचे प्रश्न इतरांना कळतील सरकार दरबारी त्यांच्या या समस्येवर उपाय निघेल, समस्याचे निराकरण होईल या आशेपोटी ग्रामीण कथाकार, कादंबरीकार लेखन करताना दिसतात यांचे उत्तम उदाहरण म्हणून सदानंद देशमुख यांचा नामोल्लेख करावा लागतो. त्यांची 'बारोमास' आणि 'तहान' ही कादंबरी शेतकऱ्यांचे प्रश्न किती गंभीर आहे याची साक्ष वरील दोन्ही कांदबऱ्या देतात. 21 व्या शतकाच्या उंबरठ्यावरचे बदलते खेडे, ग्रामीण मानसिकता आणि जीवन पद्धती यांचे प्रगल्भ दर्शन बुलढाणा येथील सदानंद देशमुख यांच्या 'तहान' मध्ये दिसते. ग्रामीण मनाची, जीवनाची 'तहान' बदलल्या वास्तव ग्रामीण समाज जीवनासह, अर्थार्जनाच्या अपुऱ्या संधीमुळे मानसिकदृष्ट्या सैरावैरा झालेल्या माणसाच्या व्यथा या कांदबरीत मुखर होताना दिसते. तर 'बोरामास' या कादंबरीत एका उच्च शिक्षत ग्रामीण शेतकऱ्याची वेदना मांडली आहे. एकंदरीत सर्वच लेखकांनी शेतकऱ्यांची अवस्था पाहून त्यांचे दुःख आपल्या साहित्यात मांडले आहे. संकटांना तोंड देऊन संकटाविरूद्ध खंबिरपणे उभे राहण्याचा निर्धार ही केला पाहिजे, अन्यायाविरूद्ध आवाज उठवला पाहिजे .आत्महत्या ही शेवटचे उपाय नाही तर खंबीरपणे, निर्भडपणे त्या समस्येला तोंड देखील दिले पाहिजे असा आशावादही ग्रामीण साहित्यात कवी आपल्या कवितेतून मांडताना दिसतात. उदा. कवी सुनील पखाले 'कास्तकारायन' या दिर्घ कवितेत या संदर्भात लिहितात.

''कास्तकार दादा । आईक आता, सांगतो तुले सल्ला
कितीक दिवस भरसीन राज्या, सावकाराचा गल्ला
मालाले तं भाव नाई, जिंदगानी मातीमोल
खांडुक तुवं खाजवून, कितिक करसीन खोल''[4]

सावकारापासून आपण नेहमीच दुर राहीले पाहिजे, सावकाराच्या जाळ्यात आपण कधीही फसू नये असा सल्लाही कवी देताना दिसतो.

एकंदरीत, ग्रामीण कथाकार, कादंबरीकार, नाटककार, कवी या सर्वांनीच ग्रामीण समस्येवर, ग्रामीण शिक्षणाच्या अडचणीवर, ग्रामीण जातीयवादावर, ग्रामीण अंधश्रद्धेवर, अपुऱ्या वैद्यकीय सेवेवर, रूढी–परंपरेवर शेतकऱ्याच्या दु:ष्काळी परिस्थितीवर, अतिवृष्टीवर, कर्जबाजारीपणावर, अपुऱ्या विद्युत पुरवठ्यावर, सावकाराकडून होणाऱ्या पिळवणूकीवर, विष प्राशण करून होणाऱ्या आत्महत्येवर, रासायनिक खतांच्या वापरामुळे होणाऱ्या खर्चावर, अपुऱ्या पुरवठ्यावर इत्यादी सर्वच समस्येवर ग्रामिण लेखकांनी अतिशय मार्मीकपणे लिहिले. या सदंर्भातील प्रश्न सतत शासनाला विचारले आहे. जेणेकरून कुठेतरी या प्रश्नाची तीव्रता कमी व्हावी, प्रश्नाचे निराकरण व्हावे, सर्वसामान्य जनतेने शेतकऱ्याकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहावे, सम्मानाने पाहावे. हीच यामागील लेखकाची भूमिका आहे. शासन दरबारी हे प्रश्न उभे करणे हे आपले कर्तव्य आहे. हे समजून देखील अनेक लेखक लिहिते झाल्याची कबुली अनेक ग्रामीण साहित्यकार देताना दिसतात. शासनाला व राजकर्त्याकत्यांना देखील ग्रामीण साहित्याने निर्माण केलेल्या प्रश्नामुळे जाग आली. या प्रश्नांची उग्रता समजून आली. त्या सर्वच प्रश्नाची गंभीर दखल शासनाला व राजकर्त्यांना घ्यावी लागली. 'पाण्याच्या' प्रश्न किती गंभीर आहे हे 'तहान' कादंबरीमुळे शासनाला कळले. 'पाण्याकरीता' स्वतःची अब्रु देखील दयायला नवयुवती कशी तयार होते यावरून पाण्याचा प्रश्न किती गंभीर आहे हे शासनाला कळले व पाण्याच्या, जलपुरवठ्याच्या अनेक योजना शासनाला यामुळे तयार कराव्या लागल्या तर 'बोरामास' मधील उच्च शिक्षणावर आधारीत शेतकऱ्यामूळे शिक्षणातील भ्रष्टाचारावर शासनाला योजना तयार कराव्या लागल्या. बुवाबाजी, मंत्रतंत्र, जादूटोणा यावरील लेखनामुळे अंधश्रद्धा निर्मुलनाचे कायदे तयार करावे लागले, त्यामुळे काही प्रमाणात शेतकऱ्याची लुबाडणूक या मांत्रीकापासून कमी झाली. दारूबंदी च्या कायद्यामुळे व्यसन कमी झाले, सावकाराच्या जाचाला कंटाळून अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या

e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

केल्याचे चित्रण अनेक ग्रामीण साहित्यीकांनी केले. त्यामुळे सावकारी प्रथा शासनाच्या नियमानुसार बंद करण्यात आली व बॅकेच्या द्वारे कर्ज वाटपाची योजना तयार करून कमी व्याजात कर्ज उपलब्ध होऊ लागले, त्यामुळे आज शेतकऱ्याचे दुःख, आर्थिक पिळवणूक काही प्रमाणात कमी झाली. रस्त्याच्या दुर्दशेवर अनेकांनी लेखन केल्यामुळे पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून रस्त्याचे व शिक्षणाचे जाळे गावात देखील निर्माण झाले. मुलभुत शिक्षणाच्या सोयी गावात निर्माण करणे शासनाला भाग पडले. शेतकऱ्यांच्या कर्जवाटपाकरीता आर्थिक व्यवहाराकरीता बॅकेच्या शाखा देखील ग्राम पातळीवर तयार करण्यात आल्या.

एकंदरीत आज ग्रामीण भागात शिक्षणाच्या, आरोग्याच्या, दळण—वळणाच्या ज्या सोयी तयार झाल्या. त्यात ग्रामीण साहित्याची किंबहूना ग्रामीण लेखकाची महत्त्वपुर्ण भुमिका असल्याचे ठामपणे मांडता येते.

**संदर्भ :**

माधव राजकुरू (संपा), 'ग्रामगीता', महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम मंडळ, पुणे, प्रकाशन 2000, पृ. क्र. अपर्ण पत्रिका.
माधव राजगुरू — उनि, पृ. क्र. पुष्पाजंली
माधव राजगुरू — उनि, पृ. क्र. 137.
डॉ. सुनिल पखाले, 'कास्तकारायन' निनाद प्रकाशन, यवतमाळ, प्रथम आवृत्ती — 2015, पृ. क्र. 17.